नियमीत दिवाणी मुकदमा क्रमांक ११/२०१८ मधील

निशाण ७ खालील प्राथमिक आदेश

१. वादी यांचा हा अर्ज वाचला.

२. अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीतर्फे विधीज्ञ एल.जी.जेधे यांचा युक्तिवाद ऐकला.

३. वादी यांचे कथनांप्रमाणे प्रतिवादी हे दावा मिळकतीचे हद्द कायम मोजणीस हरकत अडथळा करीत आहेत. प्रतिवादी यांनी केलेल्या हरकतीमुळे दावा मिळकतीची मोजणी हरकत घेतल्यामुळे मोजणी झाली नाही. दावा मिळकतीची मोजणी ०८ मार्च व ०९ मार्च या तारखांना आहे. सबब, प्रतिवादीविरुध्द एकतर्फा मनाई करावी, अशी विनंती वादी यांनी केली आहे.

४. वादी यांनी या कामी निशाण ५, अनुक्रमांक ४ सोबत हद्द कायम मोजणी नोटीसीची प्रत हजर केली असून त्यावरुन दावा मिळकतीची मोजणी दिनांक २४/०१/२०१८ रोजी होती, असे प्रथम दर्शनी दिसून येते. प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी दिलेल्या जबाबाची प्रत वादी यांनी निशाण ५, अनुक्रमांक ५ सोबत सादर केली आहे. या उलट, या मोजणीस प्रतिवादींची हरकत असल्याचे दिसून येते. निशाण ५, अनुक्रमांक ६ वरील पावतीवरुन वादी यांनी पुनर्भेट मोजणी फी भरल्याचे दिसून येते. वादी यांनी पुनर्भेट मोजणी फी दिनांक ०८ व ०९ मार्च रोजी असल्याचे कथन केले आहे. परंतु, त्याबाबतचा कोणताही प्राथमिक पुरावा वादी यांनी सादर केलेला नाही. वादी यांचे अर्जाचे अवलोकन केले असता वादी यांनी या तारखांचा उल्लेख त्यांचे अर्जात केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे,या क्षणी प्रतिवादींचे म्हणणे ऐकून न घेता प्रतिवादी यांचेविरुध्द एकतर्फा मनाई आदेश करणे योग्य व न्यायोचित वाटत नाही. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

आ दे श

१. प्रतिवादी नं. १ ते ३ यांना त्यांचे विरुध्द वादी मागणी करतात त्याप्रमाणे तूर्तातूर्त मनाईची ताकीद का करणेत येऊ नये, अशी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी.

२. जरुर तर प्रतिवादी यांना नोटीसीची बजावणी स्पेशल बेलीफ यांचे मार्फत करणेत यावी.

३. पुढील तारीख ०८/०३/२०१८ रोजी नेमण्यात येत आहे.

दिनांक : ०५/०३/२०१८ (डी.एम.हिंग्लजकर)

ठिकाण : लांजा, न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, लांजा,